# शकुंतलादेवी घाटगे यांच्याकडून ताराराणी विद्यापीठास पाच लाखाची देणगी

कोल्हापूर, दि. १४ : ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजच्या अभ्यासिकेच्या बांधकामाकरिता श्रीमती शकुंतलादेवी घाटगे यांनी ५ लाखांची देणगी समारंभपूर्वक आज संस्था पदाधिकाऱ्यांना दिली.

ताराराणी विद्यापीठाच्या आर्ट गॅलरीमध्ये हा समारंभ पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रामराव बेनाडीकर होते.

संस्थेच्या विकासासाठी ही आपली देणगी असली तरीदेखील ती अत्यल्प आहे असे विनयशील उद्‌गार श्रीमती शकुंतलादेवी हिंदुराव घाटगे यांनी आपल्या सत्कारास उत्तर देताना काढले.

संस्थेचे अध्यक्ष रामराव बेनाडीकर यांच्या हस्ते त्यांचा यावेळी सत्कार करणेत आला. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष व माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर, उपाध्यक्ष रंगरावदादा पाटील, संस्थेचे सेक्रेटरी व प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील व श्री. एम. एच. जाधव आदी उपस्थित होते.

दै. पुढारी 17/3/97

